राज्यातील मुदत समाप्त झालेल्या २ नगरपंचपयती, माहे जून-२०२२ मध्ये मुदत समाप्त होणारी १ नगरपरिषद व ४ नगरपंचायती, तसेच नवनिर्मित ३ नगरपंचायती अशा एकूण १० नगरपरिषद/नगरपंचायतींच्या सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचना कार्यक्रम-२०२२.

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/नप-२०२२/प्र.क्र.३/का-६
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २३ फेब्रुवारी, २०२२.

प्रति,

जिल्हाधिकारी,
अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर,
लातूर, अमरावती, वाशिम व चंद्रपूर.

**विषय: राज्यातील मुदत समाप्त झालेल्या २ नगरपंचायती, माहे जून-२०२२ मध्ये मुदत समाप्त होणारी १ नगरपरिषद व ४ नगरपंचायती तसेच नवनिर्मित ३ नगरपंचायती अशा एकूण १० नगरपरिषद/ नगरपंचायतींच्या सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचना कार्यक्रम-२०२२.**

**संदर्भ:** १) महाराष्ट्र अध्यादेश क्र.०५/२०२१, दि.०१/१०/२०२१.
२) महाराष्ट्र अध्यादेश क्र.१०/२०२१, दि.०२/११/२०२१.
४) आयोगाचे क्रमांक रानिआ/नप-२०२१/प्र.क्र.१०/का-६, दि.२७/१२/२०२१ रोजीचे आदेश.

महोदय/महोदया,

राज्यातील मुदत समाप्त झालेल्या २ नगरपंचायती, माहे जून-२०२२ मध्ये मुदत समाप्त होणारी **"क"** वर्गातील १ नगरपरिषद, ४ नगरपंचायती व नवनिर्मित ३ नगरपंचायती अशा एकूण १० नगरपरिषद/नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका अधिनियमातील तरतुदीनुसार घेणे आवश्यक आहे. (सोबतच्या परिशिष्ट-२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे)

२. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचाती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम ९ (२) मधील तरतुदीनुसार उपरोक्त नगरपरिषदा/नगरपंचायतींची सदस्य संख्या संबंधित विभागीय आयुक्त यांनी शासन राजपत्रात प्रसिध्द करावी.

३. महाराष्ट्र अध्यादेश क्र.५/२०२१, दि.०१/१०/२०२१ अन्वये नगरपरिषदांच्या निवडणुकांकरिता प्रत्येक प्रभागातून शक्य असेल तेथवर दोन परिषद सदस्य, परंतु तीनपेक्षा अधिक नाहीत इतके सदस्य निवडून देण्याची तरतूद केली आहे.

४. महाराष्ट्र अध्यादेश क्र.१०/२०२१, दि.०२/११/२०२१ या अन्वये नगरपरिषदांमध्ये निवडून द्यावयाच्या किमान व कमाल सदस्यांची संख्या सुधारित केली आहे.

५. नगरपंचायतीमध्ये प्रत्येक प्रभागाकरिता अधिनियमातील तरतुदीनुसार एकच सदस्य निवडून द्यावयाचा आहे.

६. नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या आरक्षणाबाबत मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या पिटीशन फॉर स्पेशल लिव्ह टू अपील (सी) क्र.१९७५६/२०२१ मध्ये दि.१९/०१/२०२२ रोजी झालेल्या आदेशानुसार राज्याने नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाबाबत असलेली आकडेवारी संबंधित मागासवर्ग आयोगास द्यावी. मागासवर्ग आयोगाने सदर आकडेवारी तपासून त्यानुसार योग्य त्या शिफारसी राज्यास तसेच राज्य निवडणूक आयोगास कराव्यात, असे आदेशित केले आहे. मात्र सदर शिफारसी प्राप्त होण्यास अथवा त्यानुसार योग्य तो निर्णय घेण्यास काही कालावधी लागण्याची शक्यता असल्याने, निवडणुकांचे कामकाज विहीत कालावधीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने निवडणूक प्रभागांच्या हद्दी निश्चित करण्याचा टप्पा तत्पूर्वी पूर्ण करून घेणे आवश्यक आहे. त्यामुळे सोडतीची प्रक्रिया पूर्ण करण्यापूर्वी प्रथम निवडणूक प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्द करून त्यावरील हरकती व सूचना प्राप्त करून सुनावणीची प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे.

७. नगरपरिषदांच्या/नगरपंचायतींच्या निवडणुकांकरिता निवडणूक प्रभागांच्या सीमा दर्शविणारी प्रारूप अधिसूचना प्रसिध्द करणे, हरकती व सूचना मागविणे व त्यावर सुनावणी देणे इत्यादींबाबत सोबतच्या **परिशिष्ट-१** मध्ये दर्शविलेल्या टप्प्यानुसार कार्यवाही करावयाची आहे. सदर वेळापत्रकानुसार प्रत्येक टप्पा वेळेवर व योग्य रितीने पूर्ण करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची राहील. त्यानुसार त्यांनी योग्य ती सर्व उपाययोजना करावी.

८. प्रभाग रचना अंतिम करण्याबाबतचे यापूर्वीचे संबंधित आदेश अधिक्रमित करुन राज्य निवडणूक आयुक्त यांनी त्यांचे अधिकार रानिआ आदेश क्र.रानिआ/नप-२०२०/प्र.क्र.१-अ/का.६, दि.०६/०२/२०२० अन्वये **संबंधित मुख्याधिकारी, जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्त यांना प्रदान केले आहेत.**

९. राज्य निवडणूक आयोगाकडे आपणाकडून प्राप्त झालेल्या माहिती नुसार **परिशिष्ट-२** मधील नमूद नगरपरिषद/नगरपंचायतींबाबत प्रभाग रचना करण्यास बाधा येणारी कोणतीही बाब जसे न्यायालयीन प्रकरण इ.बाबतची माहिती त्वरीत आयोगास अवगत करावी. **परिशिष्ट-२** मध्ये संबंधीत नगरपरिषद/नगरपंचायतींच्या मुदत समाप्तीचा/स्थापनेचा दिनांक दर्शविण्यात आला आहे.

१०. या निवडणुकांकरिता जनगणना कार्यालयाची सन २०११ च्या जनगणनेची आकडेवारी वापरण्यात यावी. तसेच याबाबत संबंधित **नगरपरिषदेचे/नगरपंचायतीचे मुख्याधिकारी यांचेकडून प्रमाणपत्र घेण्यात यावे.**

११. निवडणूक प्रक्रियेच्या विविध टप्प्यांवरील माहिती नगरपरिषद/नगपंचायत यांनी वेळोवेळी त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे बंधनकारक राहील. तसेच प्रत्येक टप्प्यावरील अहवाल राज्य निवडणूक आयोगास सादर करावा.

तसेच नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक बहुसदस्यीय प्रभाग रचना (सदस्य संख्या, प्रभाग रचना करणे व आरक्षण) आदेश २०२१ या आदेशामध्ये केलेल्या तरतुदीनुसार नगरपरिषदांची प्रभाग रचना करण्यात यावी. आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम यथावकाश राज्य निवडणूक आयोगाकडून देण्यात येईल.

१२. राज्यामध्ये कोरोना विषाणूची (कोविड-१९) महामारी सुरू असल्याने, केंद्र व राज्य शासनाने ठरवून दिलेल्या निकषांचे तंतोतंत पालन करून नमूद नगरपरिषदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचना कार्यक्रम राबवितेवेळी आवश्यक त्या सर्व उपाययोजना राबविण्यात याव्यात.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या मान्यतेने,

आपला,

( किरण कुरुंदकर )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**सहपत्र- परिशिष्ट- १ व २**

**प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी:-**

१. प्रधान सचिव ,(२)नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
३. विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन (कोकण वगळून)
४. संबंधित नगरपरिषद/नगरपंचायतींचे प्रशासक व मुख्याधिकारी.
५. संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई.
६. राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी व कार्यासने.
७. राज्य निवडणूक आयोगाचे मुंबई उच्च न्यायालयाच्या तिन्ही खंडपीठांमध्ये नेमलेले वकील.
८. निवड नस्ती/कार्या-६.

# परिशिष्ट -१

## नगरपरिषद/नगरपंचायतींसाठी प्रभाग रचना कार्यक्रम-२०२२

**निवडणूक प्रभागांच्या सीमांची प्रसिध्दी, हरकती व सूचना मागविणे, सुनावणी देणे इत्यादीचा कार्यक्रम**

**(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/नप-२०२२/प्र.क्र.३/का-०६, दि.२३/०२/२०२२ सोबतचे परिशिष्ट.)**

| अ. क्र. | टप्पा | कार्यवाही कोणी करावयाची आहे. | टप्पा सुरु करण्याचा / संपविण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | **अ) प्रारुप प्रभाग रचना** | | |
| १. | प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव (नगर परिषद/नगरपंचायतींच्या प्रभागांची संख्या, त्यांची प्रभागनिहाय एकूण व अनुसूचित जाती तसेच अनुसूचित जमातीची २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या, क्षेत्र, सीमांकन व नकाशा यासह) संबंधित **जिल्हाधिकाऱ्यामार्फत राज्य निवडणूक आयुक्त** यांचेकडे सादर करणे. | मुख्याधिकारी | ०२/०३/२०२२ (बुधवार) (पर्यंत) |
| २. | प्रारुप प्रभाग रचनेच्या प्रस्तावास मान्यता देणे. | जिल्हाधिकारी | ०७/०३/२०२२ (सोमवार) (पर्यंत) |
| | **ब) हरकती व सूचना तसेच सुनावणी** | | |
| १. | प्रारुप प्रभाग रचना, प्रभागदर्शक नकाशे (अधिसूचना कलम १० नुसार) रहिवाश्यांच्या माहितीसाठी व हरकती तसेच सूचना मागविणेकरिता वृत्तपत्रात व स्थानिकपातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगरपरिषद/नगरपंचायतींच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणे | जिल्हाधिकारी | १०/०३/२०२२ (गुरुवार) पर्यंत |
| २. | हरकती व सूचना मागविण्याचा कालावधी | | १०/०३/२०२२ (गुरुवार) ते १७/०३/२०२२ (गुरुवार) पर्यंत |
| ३. | प्राप्त हरकती व सूचनांवर सुनावणी देणे. | जिल्हाधिकारी | २२/०३/२०२२ (मंगळवार) पर्यंत |
| ४. | हरकती व सूचनांच्या अनुषंगाने अभिप्राय देऊन संबंधित **विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन** यांचेकडे अहवाल पाठविणे. | जिल्हाधिकारी | २५/०३/२०२२ (शुक्रवार) पर्यंत |
| ५. | अंतिम प्रभाग रचनेस मान्यता देणे. | संबंधित विभागीय आयुक्त | ०१/०४/२०२२ (शुक्रवार) पर्यंत |

| अ) अंतिम प्रभाग रचना<br>(प्रभाग निहाय एकूण लोकसंख्या, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची लोकसंख्या) | | | |
|---|---|---|---|
| १. | अधिनियमातील कलम १० नुसार अंतिम अधिसूचना वृत्तपत्रात व स्थानिकपातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगरपरिषद/नगरपंचायतींच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणे. | जिल्हाधिकारी | ०५/०४/२०२२ (मंगळवार) पर्यंत |

टीपः- प्रत्येक नगरपरिषद/नगरपंचायतीची प्रभाग रचनेची अंतिम अधिसूचना प्रसिध्द करण्यापर्यंतच्या कामावर नियंत्रण ठेवण्याकरीता जिल्हाधिकारी यांनी उप जिल्हाधिकारीपेक्षा कमी नसलेल्या दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करावी.

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

# परिशिष्ट -२

# नगर परिषद/नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका-२०२२

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/नप-२०२२/प्र.क्र.३/का-६, दि.२३/०२/२०२२ सोबतचे सहपत्र)

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | नगर परिषद/नगरपंचायतींचे नावे | मुदत समाप्तीचा/स्थापनेचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | अहमदनगर | नेवासा न.पं. | १८/०६/२०२२ |
| २ | पुणे | मंचर न.पं. | नवनिर्मित (२९/११/२०२१) |
| ३ | सातारा | मेढा न.पं. | ०९/०६/२०२२ |
| ४ | सांगली | शिराळा न.पं. | १४/०६/२०२२ |
| ५ | सोलापूर | अनगर न.पं. | नवनिर्मित (०१/११/२०२१) |
| ६ | लातूर | रेणापूर न.पं. | ०९/०६/२०२२ |
| ७ | अमरावती | नांदगांव खंडेश्वर न.पं. | २९/११/२०२० |
| ८ | वाशिम | मालेगांव न.पं. | ०७/०२/२०२१ |
| ९ | चंद्रपूर | नागभीड नगरपरिषद | १६/०६/२०२२ |
| १० | चंद्रपूर | भिसी न.पं. | नवनिर्मित (२६/११/२०२१) |

राज्यातील मुदत समाप्त झालेल्या २ नगरपंचपयती, माहे जून-२०२२ मध्ये मुदत समाप्त होणारी १ नगरपरिषद व ४ नगरपंचायती, तसेच नवनिर्मित ३ नगरपंचायती अशा एकूण १० नगरपरिषद/नगरपंचायतींच्या सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचना कार्यक्रम-२०२२.

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/नप-२०२२/प्र.क्र.३/का-६
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २४ फेब्रुवारी, २०२२.

शुध्दीपत्रक

प्रति,
जिल्हाधिकारी,
अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर,
लातूर, अमरावती, वाशिम व चंद्रपूर.

**विषय:** राज्यातील मुदत समाप्त झालेल्या २ नगरपंचायती, माहे जून-२०२२ मध्ये मुदत समाप्त होणारी १ नगरपरिषद व ४ नगरपंचायती तसेच नवनिर्मित ३ नगरपंचायती अशा एकूण १० नगरपरिषद/ नगरपंचायतींच्या सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचना कार्यक्रम-२०२२.

**संदर्भ:** राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दि.२३/०२/२०२२ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयांकीत संदर्भाधीन पत्रान्वये १ नगरपरिषद व ९ नगरपंचायतींच्या सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचना कार्यक्रम देण्यात आला असून, सदर कार्यक्रमातील **परिशिष्ट-१** मधील अ-प्रारुप प्रभाग रचना यामधील अनुक्रमांक १ मध्ये चुकून **प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव संबंधित जिल्हाधिकाऱ्यामार्फत राज्य निवडणूक आयुक्त यांचेकडे सादर करणे** असे नमूद झाले आहे. त्याऐवजी **प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करणे** असे वाचावे. तसेच मागील पृष्ठावरील नमूद अ- **अंतिम प्रभाग रचना** ऐवजी **क-अंतिम प्रभाग रचना** असे वाचावे ही विनंती.

आपला,
(सही) 28.02.2022
(संजय सावंत)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी:-**

१. प्रधान सचिव , (२)नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
३. विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन (कोकण वगळून)
४. संबंधित नगरपरिषद/नगरपंचायतींचे प्रशासक व मुख्याधिकारी.
५. संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई.
६. राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी व कार्यासने.
७. राज्य निवडणूक आयोगाचे मुंबई उच्च न्यायालयाच्या तिन्ही खंडपीठांमध्ये नेमलेले वकील.
८. निवड नस्ती/कार्या-६.